# जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस

P.R.O. Office, Crime Branch, Pune City

**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001

**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police


**प्रेसनोट क्रमांक - १५० दिनांक -१२/०३/२०२२**

आर्थिक व सायबर गुन्हे शाखा , पुणे शहर

पुणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत सन २०१८ मध्ये क्रिप्टो करन्सी मध्ये गुंतवणुकीच्या बहाण्याने बऱ्याच पिडीतांना फसविणाऱ्या आरोपीतां विरुध्द दत्तवाडी पोलीस ठाणे, गुरनं २८/२०१८ व निगडी पोलीस ठाणे गुरनं १८१/२०१८ दोन्ही मध्ये भादंवि कलम ४०६, ४०९, ४२०, १२०(ब), १०९, २०१ सह एम.पी.आय.डी. कायदा कलम ३, ४ अन्वये गुन्हे नोंद झालेले होते.

या गुन्हयांचे तपासामध्ये तत्कालीन तपासी अधिकाऱ्यास अटक आरोपीतांकडून तांत्रिक पुरावे गोळा करणे व क्रिप्टो करन्सी संबंधी गुन्हयातील मालमत्ता जप्त करणेसाठी क्रिप्टो करन्सी मधील व्यवहाराची माहिती असलेल्या तांत्रिक तज्ञांची मदत घेतली होती. त्यामध्ये ग्लोबल ब्लॉकचेन फाऊंडेशन, पुणे तर्फे पंकज प्रकाश घोडे, रा. ताडीवाला रोड, पुणे व के.पी.एम.जी., पुणे तर्फे रविंद्र प्रभाकर पाटील, रा. बिबवेवाडी, पुणे यांचा समावेश होता. मात्र त्यांनी या गुन्हयांतील अटक आरोपीताकडून क्रीप्टो करन्सी जप्त करताना संशयास्पद भूमिका निभावल्याचे प्रकरणाची चौकशी मा. अपर पोलीस महासंचालक, आर्थिक गुन्हे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेशान्वये करण्यास सांगीतले होते. त्यानुसार या प्रकरणाची चौकशी पोलीस आयुक्तालयातील पोलीस उपायुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे, पुणे शहर यांचेकरवी करण्यात आली.

या गुन्हयांचे तपासादरम्यान एकूण १७ आरोपींना अटक करण्यात आली होती. त्यांचेकडून तांत्रिक तज्ञ रविंद्र पाटील व पंकज घोडे यांनी काही क्रीप्टो करन्सी (२४१.४७८५८०५५ बिट कॉईन, ४५२ बिट कॉईन कॅश, ९४.२५४१२४ इथर) जप्त केली होती. हे करीत असताना तत्कालीन तपास अधिकारी यांनी आरोपीतांचा जप्त तांत्रिक डाटा विश्वासने त्यांचेकडे सुपुर्द केला होता. त्यामुळे रविंद्र पाटील व पंकज घोडे यांनी सदर गुन्हयाचे तपासातील तांत्रिक तज्ञांवरील अवलंबित्व पाहता तपासादरम्यान उच्च दर्जाची व्यावसायिक नैतिकता व सचोटी दाखविणे अभिप्रेत होते. परंतू रविंद्रनाथ पाटील याने तपास अधिकाऱ्याने विश्वासाने सुपूर्द केलेल्या तांत्रिक डेटाचा अप्रामाणिक उद्देशाने गैरवापर करुन स्वतःला गैरलाभ मिळविणे करीता विश्वासघात करुन तपास अधिकारी यांनी जप्त केलेल्या आरोपीचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीप्टो एक्सचेंजच्या वॉलेट मधून क्रीप्टो करन्सी, स्वतःचे तसेच त्यांचे अन्य साथिदारांचे विविध क्रीप्टो करन्सी वॉलेट मध्ये परस्पर अप्रामाणिक उद्देशाने वळवून घेतले. तसेच पंकज घोडे याने तपासी अधिकाऱ्यांची दिशाभूल करण्यासाठी जप्ती पंचनामे करताना आरोपीच्या सदर वॉलेटच्या ब्लॉकचेनचे स्क्रीनशॉट्स चे बनावटीकरण केले व सदरचे बनावट स्क्रीनशॉटस् खरे असल्याचे भासवून तपासकामी सादर केले. तसेच आरोपीचे जप्त केलेल्या वॉलेट बाबत खोटी माहिती देवून गुन्हयाचे तपासाची दिशाभूल केली असून त्याने आरोपीच्या वॉलेट मधील क्रीप्टो करन्सीमधील पूर्ण बिटकॉईन जप्त न करता काही भाग तसाच ठेवून शासनाची फसवणूक करुन संशयास्पद कृती केल्याचे चौकशीत आढळले आहे.

तज्ञांच्या या संशयास्पद भुमिकेच्या वर्तनाबाबत प्राप्त तांत्रिक पुरावे व त्यांनी गुन्हयातील आरोपीताची क्रीप्टो करन्सी त्यांचे स्वतःचे व अन्य खात्यांवर वळवून घेतल्याचे त्यांचे के.वाय.सी. वरुन स्पष्ट झाले आहे. त्यामुळे पंकज घोडे व रविंद्रनाथ पाटील यांचे विरोधात सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे दि. ११/०३/२०२२ रोजी गुरनं. ०८/२०२२, भा.दं.वि.कलम - भारतीय दंड विधान संहिता कलम ४०९, ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (सी), सह एम.पी.आय.डी. ॲक्ट ३, ४ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या गुन्हयाचा तपास पोनि चिंतामण, सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर हे करीत आहेत.

गुन्हयाचे तपासा दरम्यान आरोपीतांचे घरी, ऑफीस व नातेवाईकांचे घरी झडती व जप्ती कारवाई करण्यात आली आहे. या दोन्ही आरोपीतांचा सहभाग यापुर्वीच उघड झाला असल्याने त्यांचे निवासस्थानातून पथकाने ताब्यात घेवून अटक कारवाई केलेली आहे. अटक आरोपीतांना मा. न्यायालया समक्ष हजर केले असता आरोपीतांना दि.१९/०३/२०२२ रोजीपर्यत ०७ दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.

सदरची कारवाई मा.श्री.अमिताभ गुप्ता, पोलीस आयुक्त, पुणे शहर, मा.श्री रविंद्र शिसवे, सह पोलीस आयुक्त, पुणे शहर, श्री. रामनाथ पोकळे, मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे शहर, मा. भाग्यश्री नवटके, पोलीस उपआयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे, विजयकुमार पळसुले, सहाय्यक पोलीस आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे, व.पो.नि. डी.एस.हाके यांचे मार्गदर्शनाखाली, तपासी अधिकारी पोनि चिंतामण, तसेच पोनि - मिनल सुपे-पाटील, राजुरकर, खेडकर, कोळी, भोसले, भापकर, नलावडे, सपोनि - वाळके, पो.उप नि. - नेमाणे, डफळ, पडवळ, व २७ अंमलदार तसेच न्याय वैज्ञानिक प्रयोग शाळेतील तज्ञ अधिकारी - श्री. तेजस कट्टे, श्रीमती तनुजा सुर्यराव, श्री. राहूल कनोज व श्रीमती गायकवाड या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.